महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५७ वा | दिनांक : २४/११/२०२४ | वार : रविवार

# लाडकी बहीण योजना गेम चेंजर ठरली : अजित पवार



**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळाले आहे. यानंतर महायुतीमधील नेत्यांनी पत्रकार परिषद देखील घेतली. या पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मिळालेल्या विजयावर प्रतिक्रिया दिली आहे. लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. बहिणींनी अंडरकरंट असा दाखवला की सगळे उताणे पडले, आडवे पडले, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली आहे.

अजित पवार म्हणाले, कार्यकर्ते राबले, उमेदवार राबले, घटकपक्षांचे सहकारी राबले. सर्वजण आपली निवडणूक आहे असे समजून कामाला लागले. आमच्या योजनांबाबत टीका टिप्पणी करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत आम्हाला अपयश आले. महाराष्ट्रात अपयश आले होते, ते अपयश आम्ही मान्य केले. त्याच्यातून सावरण्याचा प्रयत्न केला. अर्थसंकल्प सादर करताना अनेक योजना मांडल्या, त्या लोकप्रिय झाल्या.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, सर्वजण आपापले अंदाज व्यक्त करत होते. बाकीच्यांचे गाड्या फिरवणे, इकडे जाणे तिकडे जाणे सुरु होते. आम्ही पहिल्यांदा पावणे दोनशेच्या पुढे जाऊ असे वाटत होते. मात्र, कालचे सर्व पाहिल्यावर आम्ही खाली जातो की काय असे वाटत होते. परंतु, महाराष्ट्रातील जनतेने विकासाकडे बघून महायुतीला प्रचंड अशा प्रकारचे यश मिळवून दिले आहे, असे म्हणत अजित पवारांनी जनतेचे आभार मानले.

अजित पवार म्हणाले, आमच्यावर जबाबदारी वाढलेली आहे. एवढ्या प्रचंड बहुमतानं सरकार आलं आहे. मी राजकारणात आल्यापासून २२२ आणि तसं २२५ महायुतीला जागा मिळाल्या. एवढं कधी पाहिलं नाही. या यशानं हुरळून देखील जाणार नाही. जसे जसे आकडे पाहत होतो, तेव्हा आर्थिक गोष्टी समोर येत होत्या. आर्थिक शिस्त समोर आणू, आम्हाला याचा अनुभव आहे. आमच्या पाठिशी केंद्र सरकार आहे. त्याचा आधार आहे.

विरोधक निवडणूक टीका करतात बॅलट पेपरने निवडणूक घ्यायला पाहिजे होती मग लोकसभा निवडणूक देखील बॅलट पेपरवर घ्यायला हवी होती. झारखंड आमच्या हातून गेले, आम्ही काय म्हणतोय का? असा सवालही यावेळी बोलताना अजित पवार यांनी उपस्थित केला.

# काँग्रेसच्या बड्या नेत्यांचा पराभव



**मुंबई :** बाळासाहेब थोरात, नाना पटोले, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार यांच्यासह यशोमती ठाकूर, माणिकराव ठाकरे अशा काँग्रेसच्या दिग्गजांना मतदारांनी धक्का दिला आहे. राज्यात आमचीच सत्ता येईल, तसेच काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल, असा दावा करणारे दिग्गज नेते स्वत:चाच मतदार संघ वाचवू शकले नाहीत. त्यामुळे राज्यातील काँग्रेसचा हा मोठा पराभव मानला जात आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीने काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. सत्ता स्थापनेचा दावा करणारे काँग्रेसवर आता अनेक मतदारसंघातील महत्त्वाचे नेते गमावण्याची नामुष्की ओढावली आहे. इतकेच नाही तर काँग्रेस मधून मुख्यमंत्री पदाचा दावा ठोकणाऱ्या प्रमुख नेत्यांचा देखील पराभव झाला आहे. त्यातही ज्या नेत्यांचा विजय झाला, तो देखील अवघ्या काही मतांनी निसटचा विजय मिळाला असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे काँग्रेसचा राज्यात सुपडा साफ झाला असल्याचे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब भाऊसाहेब थोरात हे पराभूत झाले आहेत. थोरात हे काँग्रेसचे मुख्यमंत्री पदाचे दावेदान मानले जात होते. तसेच सध्या राज्यातील सर्वात ज्येष्ठ नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. मात्र, स्वत:चा मतदार संघ राखण्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे हा पराभव काँग्रेसच्या जिव्हारी लागण्याची शक्यता आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ नोव्हेंबर २०२४


## अतुल सावेंचा सलग तिसरा विजय



**छत्रपती संभाजीनगर :** औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघातून भाजप महायुतीचे उमेदवार अतुल सावे विजयी झाले आहेत. औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघात सुरुवातीच्या मतमोजणीच्या वेळी एमआयएमचे उमेदवार व माजी खासदार इम्तियाज जलील हे आघाडीवर होते, मात्र दुसऱ्या सत्राच्या मतमोजणीत जलील पिछाडीवर आले व अतुल सावे यांनी बाजी मारली आहे.

अतुल सावे यांना ९३२७४ इतकी मते मिळाली तर इम्तियाज जलील यांना ९१११३ मते मिळली आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत भाजप प्रणित महायुतीचा मोठा विजय झाला आहे. आतापर्यंतच्या मतमोजणीत महायुतीने सर्वाधिक २२५ जागांवर आघाडी घेतली आहे. तर महाविकास आघाडी अवघ्या ५० जागांवर आघाडीवर आहे. देवेंद्र फडणवीस यांनी या विजयावर आनंद व्यक्त करताना हा महायुतीच्या एकजुटीचा विजय असल्याची भावना व्यक्त केली आहे.

देवेंद्र फडणवीस दुपारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आजच्या विजयामुळे संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे असल्याचे स्पष्ट झाले. मोदींनी दिलेला एक है तो सेफ है चा नारा मतदारांनी यशस्वी केला. सर्वांनी एकत्रित मतदान केले. आम्ही आमच्या लाडक्या बहिणींचे विशेष आभार मानतो. त्यांनी आम्हाला मोठा आशीर्वाद दिला.

विरोधकांनी राज्यात फेक नरेटिव्ह तयार केला होता. या नरेटिव्हचा यशस्वी सामना करणाऱ्या आमच्या राष्ट्रीय विचारांच्या विविध संघटनांचा हा विजय आहे. महाविकास आघाडीने महाराष्ट्रात मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला, पण याविरोधात आमच्या विविध पंथांच्या संतांनी जनजागृती केली. हा त्यांचा विजय आहे. खेड्यापाड्यात गावोगावी जाऊन पक्षासाठी घाम गाळणाऱ्या आमच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा हा विजय आहे.

# प्रथम पक्षांतर्गत नेता, नंतर मुख्यमंत्री निवडणार : फडणवीस



**मुंबई :** विधानसभेत महायुतीचा ऐतिहासिक विजय झाला आहे. आतापर्यंतच्या अनेक वर्षांचा निवडणुका आपण पाहिल्या मात्र अशा पद्धतीने लोकांनी हातात घेतलेली निवडणूक आपण पाहिली नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रासाठी आजचा दिवस ऐतिहासिक असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. लाडक्या बहिणी असेल, लाडके भाऊ असतील किंवा लाडके शेतकरी असतील या सर्वांनी महायुतीवर मनापासून प्रेम दाखवले आहे. त्या सर्वांचे आभार देखील शिंदे यांनी मानले आहे. या ऐतिहासिक विषयासाठी सर्वांना दंडवत घातला पाहिजे, अशा शब्दात मतदारांचे आभार देखील शिंदे यांनी मानले. महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत राज्यातील जनतेचे अभार मानले.

मागील दोन ते सव्वा दोन वर्षात या राज्यांमध्ये जे काम केले, त्या सर्व कामाची ही पोचपावती असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. आम्ही जे ऐतिहासिक निर्णय घेतले ते निर्णय आतापर्यंतच्या इतिहासामध्ये न भूतो न भविष्यती असे निर्णय होते. आम्ही एकीकडे विकास केला. यात महाविकास आघाडीने जी सर्व कामे थांबवली होती ती सर्व कामे सुरू केली असल्याचा दावा देखील मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. राष्ट्रवादी कोणाची याचा निर्णय जनतेने दिला असल्याचे देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारा असलेली शिवसेना कोणाची, याचही निर्णय जनतेने दिला असल्याचा दावा शिंदे यांनी केला आहे. घरी बसून सरकार चालत नसते, हे जनतेने दाखवून दिले. असे म्हणत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

महाराष्ट्राच्या जनतेसमोर महायुती नतमस्तक असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. महायुतीवर महाराष्ट्राने दाखवलेला हा विश्वास आहे. त्यामुळे आम्हाला आता मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात काम करावे लागणार असल्याची जाणीव होत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रातील सर्व मतदारांच्या चरणी आम्ही नतमस्तक होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर त्यांना मतदारांना आश्वस्त करतो की, जनतेने आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला आम्ही तडा जाऊ देणार नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. आमची जबाबदारी वाढवणारा हा विजय असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

# राज्यात महायुतीला घवघवीत यश

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने शहरात जल्लोष







**छत्रपती संभाजीनगर :** राज्यांमध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला घवघवीत यश मिळाल्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या वतीने आज शनिवारी सायंकाळी पक्षाच्या शहर कार्यालयात पेढे वाटून जल्लोष करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे शहराध्यक्ष नागराज गायकवाड म्हणाले की, आंबेडकरी जनतेने आता भावनिक राजकारण न करता विकासाचे राजकारण करणे आवश्यक आहे. रिपब्लिकन पक्षाने कायमच विकासाचे राजकारण केले आहे. पक्षाचा महायुतीला भर भक्कम पाठिंबा असल्याने राज्यामध्ये महायुतीचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आले आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही महायुतीच्या उमेदवारासाठी झटून काम केले त्यामुळे उमेदवार निवडून आले आहेत. आगामी महापालिका निवडणुकीमध्ये ही जनता महायुतीच्या पाठीमागे उभे राहील असा विश्वास नागराज गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रसंगी अश्विन जोगदंड, शहर सचिव मनोज भालेराव, मुकेश गायकवाड, अश्विन मेश्राम, सिद्धार्थ खोतकर, प्रणव गाडे, विकास राऊत, प्रशांत वावळे, निलेश वाघमारे, कुलभूषण गायकवाड, रोहन दलाल, प्रतीक दामदार, गणेश घोंगडे, प्रदीप खंडारे, मंदार कुलकर्णी, तुषार आमटे, शेख परवेज, दीपक मिसाळ, चेतन जाधव, गणेश वाघोले, युवराज कुशल, शरदचंद्र शेगावकर, अनुराग सुरडकर, आकाश चव्हाण, सदानंद धांडे, सागर देशमुख, प्रशांत झरे, शुभम खापरे, राहुल मोरे, सागर सरकटे, विशाल मोरे, अरविंद घनसावत, रोहित आव्हाड यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते

**आपली शाळा, महविद्यालय, संस्था व संघटना यांच्या बातम्या, फोटो 7588005002 या नंबर वर व्हॉट्स ॲप वर पाठवा....कथा,कविता,पुस्तक परीक्षण, वैचारिक लेखन देखील उपरोक्त नंबर पाठवावे**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ नोव्हेंबर २०२४


## वसमतमध्ये शिष्याची राजकीय गुरूवर मात





**हिंगोली :** वसमत विधानसभा मतदार संघात शिष्यानेच राजकिय गुरुवर मात करून एकहाती विजय मिळविला आहे. विद्यमान आमदार राजेश नवघरे यांनी माजीमंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांना २९ हजार मतांनी पराभूत केले. या निवडणुकीमुळे आता दोघांमधी वितुष्ट वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

वसमत विधानसभा मतदार संघात माजीमंत्री जयप्रकाश दांडेगावकर हे विद्यमान आमदार राजेश नवघरे यांचे राजकिय गुरु म्हणून ओळखले जातात. सन २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत नवीन चेहऱ्याला संधी मिळावी यासाठी दांडेगावकर यांनी माघार घेऊन नवघरे यांना निवडणुक रिंगणात उतरविले होते. त्यावेळी नवघरे यांनी विजय मिळविला.

मात्र राष्ट्रवादीच्या फुटीनंतर आमदार नवघरे यांनी अजित पवार गट जवळ केला. त्यामुळे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह माजीमंत्री दांडेगावकर यांनी आमदार नवघरे यांच्या भुमीकेवर नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे या निवडणुकीत नवघरे यांचा पराभव करण्यासाठी माजीमंत्री दांडेगावकर यांनी शरद पवार गटाकडून निवडणुक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राजकिय गुरु –शिष्यामध्ये कोण बाजी मारणार याकडे मतदारांचे लक्ष लागले होते. या शिवाय राजकिय गुरु-शिष्यामध्ये अध्यात्मिक गुरु असलेले गुरु पादेश्वर शिवाचार्य महाराज यांनी निवडणुक रिंगणात उडी घेतली. त्यामुळे मतविभाजन अटळ झाले होते.

दरम्यान, या निवडणुकीत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी वसमत येथे सभा घेतली होती. तर विद्यमान आमदार नवघरे यांनी जवळच्या कार्यकर्ते पदाधिकारी व नातेवाईकांना सोबत घेत प्रचार सुरु केला. यामध्ये त्यांनी बाहेरचा उमेदवार म्हणून दांडेगावकर यांचा उल्लेख केला तर आपण वसमत विधानसभेचे भुमीपुत्र असल्याचा प्रचार चालविला होता.

या निवडणुकीत विद्यमान आमदार नवघरे यांनी माजीमंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचा २९ हजार मतांनी पराभव केला. विशेष म्हणजे वसमत शहर वगळता संपूर्ण मतदार संघात नवघरे यांना आघाडी मिळाली आहे. आमदार नवघरे यांना १ लाख ५ हजारपेक्षा अधिक मतदान मिळाले तर दांडेगावकर यांना ७६ हजार पेक्षा अधिक मते मिळाली आहेत. तर गुरु पादेश्वर महाराज यांना ३४ हजार पेक्षा अधिक मते मिळाली आहे.

## कन्नड मतदारसंघात 'जोर का झटका धीरेसे' संजना जाधव विजयी



**कन्नड(अरुण थोरात):** कन्नड सोयगाव विधानसभा निवडणूक मतमोजणीत मा.केंद्रिय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची कन्या, शिवसेना उमेदवार संजनाताई जाधव यांनी पूर्वाश्रमीचे पती, प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवार हर्षवर्धन जाधव यांचा १८२१० मतांनी प्रभाव करीत दणदणीत विजय मिळविला आहे.

मतदान प्रचार दरम्यान मतदार संघात चौरंगी लढतीचे चित्र निर्माण झाले होते. मतमोजणी दरम्यान संजनाताई जाधव यांनी सर्व फेर्यांत आपली मतांची आघाडी कायम ठेवली. मतदार संघातील सर्व विभागांत त्यांना भरघोस मते मिळत गेली. अंतिम फेरीत त्यांना ८४४९२ मते मिळाली, प्रतिस्पर्धी उमेदवार मा.आ. हर्षवर्धन जाधव (अपक्ष) यांना ६६२९१ मते, मा.आ. उदयसिंग राजपूत (उबाठा) ४६५१० मते, मनोज पवार (अपक्ष) ११७३५ मते मिळाली. त्यात त्यांनी १८२०१ मतांची आघाडी घेत हर्षवर्धन जाधव यांचा तर ३७९८२ मतांनी मा.आ. उदयसिंग राजपूत यांचा पराभव केला.

२०२४ ही विधानसभा निवडणूक भावनिक मुद्द्यांच्या प्रचारांनी गाजली. संजनाताई जाधव यांनी गेल्या चार वर्षात मतदार संघ पिंजून काढत आपले अस्तित्व गाव खेड्यां पर्यंत दाखवून दिले, महायुती ची उमेदवारी हा त्यांचा टर्निंग पॉइंट ठरला. यातून मित्र पक्षांतील काही नेते दूर गेले तर भाजप ची यंत्रणा त्यांच्या पाठिशी भक्कम उभी राहिली. महायुती सरकारची लाडकी बहिण योजना व इतर योजनांचा ही त्यांना परपूर प्रमाणात झाला.

केंद्र व राज्यातील महायुती चे संभावित सरकार, मनोज जरांगे यांनी निवडणूकीत घेतलेली तटस्थ भुमीका त्यांच्या पथ्यावर पडली. विशेषत: तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरावस्था मा.आ. उदयसिंग राजपूत यांना भोवली, त्यामुळे सर्व अनुमानांना धक्का देत संजनाताई जाधव विजयी होऊण मतदार संघातील दुसरी महिला आमदार होण्याचा मान मिळविला. यागोदर त्यांच्या सासू तेजस्विनी जाधव पहिल्या महिला आमदार ठरल्या होत्या.

संजनाताई जाधव यांना विजयी घोषित करतात महायुती कार्यकर्त्यांनी फटाके फोडत जल्लोष साजरा केला.

उमेदवार निहाय मिळालेली मते:-संजनाताई जाधव(शिवसेना) ८४४९२, हर्षवर्धन जाधव (अपक्ष) ६६२९२, उदयसिंग राजपूत (उबाठा) ४६५१०, मनोज पवार (अपक्ष) ११७३५, अय्यास शहा(वंचित) ८५३९, लखन चव्हाण (मनसे) ३५९५, अब्दुल जावेद(अपक्ष) ३२०८, संगीता जाधव(अपक्ष) १७६४, रंजना जाधव (बसपा) १०२२, हय्यास मोईनुद्दीन (ज.लो.पा.) ७४३, वैभव भंडारे (अपक्ष) ६९५, युवराज बोरसे(अपक्ष) ५३२, डॉ. विकास बरबंडे(हिं.स.पा) ४८७, मनिष राठोड(अपक्ष) ४८३, विठ्ठलराव थोरात (अपक्ष) ४७५, नोटा १०९३ मते.


**मराठी टायपिंगसाठी**

**डी.टी.पी.ऑपरेटर मुले पाहिजे**

------: संपर्क :------

**साहिल कॉम्प्युटर्स**

विद्यापीठ गेटजवळ, मोनूज हॉटेल,

जयसिंगपूरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद)

मो. 8956362639 /8087880274


## मतदान महाराष्ट्राने केले की ईव्हीएमने? : आदित्य ठाकरे



**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होत असून कोणाची सत्ता येणार, हे जवळपास निश्चित झाले आहे. महायुतीकडून विजयाचा जल्लोष साजरा केला जात आहे. या दरम्यान ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांची प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. निवडणुकीत अपेक्षित असे निकाल आले नाही. महाराष्ट्रातील जनतेने मतदान केले की ईव्हीएमने मतदान केले, हा मोठा प्रश्न आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

आदित्य ठाकरे म्हणाले की, आम्हाला लोकसभा निवडणुकीत याच महाराष्ट्राने आशीर्वाद दिले. संपूर्ण महाराष्ट्रात जनता महाविकास आघाडीसोबत असल्याची लाट दिसत होती. पण जे निकाल सर्वांना अपेक्षित होते, ते आले नाही. यंदाच्या निवडणुकीत ईव्हीएमने किती प्रचार केला हे पहावे लागेल. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने मतदान केले की ईव्हीएमने मतदान केले, हा मोठा प्रश्न आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, निष्ठावंत म्हणून जिथे काम केले तिथे विजय झाला आहे. पण महाराष्ट्रातील आलेला निकाल पाहता, आपल्याला अपेक्षित असे निकाल आलेले नाहीत. आता निकालाचा आढावा घेत असून त्यावर लवकरच बोलू. या सगळ्यावर बोलण्यासाठी उद्धव ठाकरे लवकरच पत्रकार परिषद घेतील.

काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांच्या पराभवावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, ज्या ठिकाणी लोक आपल्यासोबत आहे, असे शंभर टक्के वाटत होते, तिथेही पराभव झाला. तेथील असा निकाल तरी अपेक्षित नव्हता. त्यामुळे या सर्वांवर टेक्निकल चर्चा होणे गरजेचे आहे.

दरम्यान, आदित्य ठाकरे यांचा वरळी मतदारसंघातून विजय झाला आहे. त्यांना जवळपास ६१ हजार मते मिळाली आहेत. तर शिंदे गटाचे उमेदवार मिलिंद देवरा यांना ५२ हजार १९८ मते मिळाली आहे. या मतदारसंघात संदीप देशपांडे यांना देखील मनसेने उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, त्यांना केवळ १८ हजार मते मिळाली आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ नोव्हेंबर २०२४


## पुंजाजी मालुंजकर यांच्या कादंबरीचे प्रकाशन



**नाशिक :** चिखल-मातीत राबणारे, उन्हातान्हात कष्टाच्या घामाने भिजणारा शेतकरी जेव्हा कथेचा नायक होतो, तेव्हा ती कथा काळजाला भिडते आणि अशा वास्तववादी लेखनातूनच क्रांतीची सुरुवात होत असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी केले. पुंजाजी मालुंजकर लिखित 'हे दान या भूमीचे' या कादंबरीच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. मानवधन शिक्षण संस्थेच्या धनलक्ष्मी विद्यालयात या कादंबरीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वैशाली प्रकाशनचे प्रकाशक विलास पोतदार, साहित्यिक प्राचार्य दत्तात्रेय झनकर, लेखक पुंजाजी मालुंजकर, मानवधन संस्थेचे प्रमुख प्रकाश कोल्हे, साहित्यिक विवेक उगलमुगले आदी उपस्थित होते. ज्येष्ठ साहित्यिक कांबळे म्हणाले, की शेतकरी हा देशातील आतापर्यंत सर्वात उपेक्षित घटक आहे. अतिशय कष्टाने पिकवलेले धान्य आजही कवडीमोल भावाने विकण्यास भाग पाडले जाते.

त्यामुळे शेतकरी आजही अतिशय हलाखीत जीवन जगत आहे. स्वत: उत्पादित केलेल्या मालावार प्रक्रिया करून स्वताच जेव्हा बाजारात विक्री करेल तेव्हा शेतकरी खऱ्या अर्थाने सधन होईल. 'हे दान या भूमीचे' या कादंबरीचे लेखक पुंजाजी मालुंजकर यांनी शेतकऱ्यांची दुःख आणि त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग आतिशय प्रभावीपणे मांडणी केली आहे ती कादंबरी प्रत्येकाने वाचावी असे आवाहन कांबळे यांनी केले.

## संत शिरोमणी मारुती महाराज कारखान्याचा गाळप शुभारंभ




**औसा :** श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना मर्या., माऊली नगर,बेलकुंड कारखान्याचा सन २०२४ - २५ च्या गळीत हंगामाचा मोळी पूजन कार्यक्रम आज २२ नोव्हेंबरला सकाळी कारखान्याचे चेअरमन शाम भोसले , सचिन पाटील यांच्या हस्ते व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत पार पडला. तत्पूर्वी कारखान्याचे ज्येष्ठ संचालिका निवेदिता पाटील या दाम्पत्याचे हस्ते सत्यनारायण व गव्हाण पूजा करण्यात आली.

कारखाना स्वमालकीचे नविन हार्वेस्टर व इन्फीडर पुजन मागील गळीत हंगामात ऊस तोडणी वाहतुक-करीता मजुरांच्या कमतरतेमुळे आलेल्या अडचणी लक्षात घेवुन सहकारमहर्षी मा.दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाने चालु हंगामा करीता दि. लातूर जि.म.सह. बँक यांच्या सौजन्याने ९ हार्वेस्टर (ऊस तोडणी यंत्र), १८ इन्फील्डर खरेदी केले. हार्वेस्टरचे पुजन कारखान्याचे चेअरमन, व्हा.चेअरमन संस्थापक चेअरमन, माजी चेअरमन व संचालक मंडळ यांचे शुभहस्ते विधिवत पुजा करण्यात आली.

गाळप हंगाम शुभारंभ प्रसंगी सचिन पाटील यांनी आपल्या मनोगतातून ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी, कामगार यांना शुभेच्छा देवुन खऱ्या अर्थाने ऊस उत्पादक शेतकरी यांच्या दिवाळीची सुरुवात झाली . कारखान्याच्या मिलचे चक्र फिरले की ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांचे अर्थचक्र फिरते, आणि कारखान्याच्या कर्मचाऱ्यांनी सर्वांनी एकजुटीने तन-मनाने काम करून हा आव्हानात्मक २०२४- २५ चा हंगाम सर्व अधिकारी कर्मचारी, कामगार होते.

## समाजाभिमुख संशोधनांना प्राधान्य द्यावे : प्रभारी कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे



**धुळे :** संशोधनाच्या माध्यमातून व्यक्ती आणि समाजाचा विकास साधता यावा यादृष्टीने समाजाभिमुख संशोधन करण्यावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा, असे प्रतिपादन कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सामाजिक शास्त्र प्रशाळा आणि विद्यार्थी विकास विभागातर्फे संशोधन प्रकल्प सादरीकरण कार्यशाळा झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अजय पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, प्रा. विशाल पराते, डॉ. उमेश गोगडीया, डॉ. जुगलकिशोर दुबे आदी उपस्थित होते. प्रा. इंगळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी या प्रकारची कार्यशाळा महत्त्वाची ठरते. विद्यार्थ्यांनी वस्तुनिष्ठ तथ्यावर आधारित संशोधन करणे गरज असल्याचे ते म्हणाले. या वेळी डॉ. जुगलकिशोर दुबे यांनी संशोधन विषय निवड, साहित्याचा आढावा उद्दिष्टे आणि गृहितकांची निर्मिती या विषयावर, डॉ. मनिषा इंदाणी यांनी संशोधन आराखडा, डॉ. गोगडीया यांनी तथ्य संकलन आणि विश्लेषण या विषयावर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात डॉ. विकास पाटील यांनी संशोधन कार्यात आयसीटीचा वापर यावर मांडणी केली. डॉ. रमेश सरदार यांनी आविष्कार संशोधन स्पर्धेविषयी माहिती दिली. समन्वयक डॉ. मनोज इंगोले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. समाधान बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमेश गोगडीया यांनी आभार मानले. या वेळी कोणत्या प्रकारच्या संशोधनांना विद्यार्थ्यांनी प्राधान्य देण्याची गरज आहे यावर प्रकाशझोत टाकण्यात आला.

## शिंदेंच्या ५० बंडखोर आमदारांपैकी १ आमदाराचा पराभव

**सांगोला :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगोला मतदारसंघात मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेतील बंडखोरीत एकनाथ शिंदे यांना साथ देणाऱ्या विद्यमान आमदार शहाजी बापू पाटील यांचा पराभव झाला. शेकापचे बाबासाहेब देशमुख यांनी त्यांचा पराभव केला. आबासाहेब देशमुख २५ हजार ३८४ मतांनी विजयी झाले आहेत.

माझ्यासोबत आलेल्या ५० आमदारांपैकी एकजरी पडला तर, मी गावाकडे शेती जाऊन शेती करेन, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात सांगितले होते. पण गुवाहाटीला जाणाऱ्या आमदारांपैकी शहाजी बापू पाटील यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

सांगोला हा मतदारसंघ पूर्वीपासून शेकापचा बालेकिल्ला होता. गणपतराव देशमुख या मतदारसंघातून ११ वेळा विधानसभेवर निवडून गेले होते. खुद्द शहाजीबापूंनी देशमुखांविरोधात ६ वेळा निवडणूक लढविली होती. पण तेव्हा त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. २०१९ ला बाबासाहेब देशमुख यांची वय झाल्याने निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे शहाजीबापू पाटील यांना संधी चालून आली होती. २०१९ च्या निवडणुकीत शहाजी पाटलांचा विजय झाला होता. यंदाच्या निवडणुकीत बाबासाहेब देशमुख यांनी १ लाख १६ हजार २८० मते घेत शहाजी बापू पाटील यांचा २५ हजार ३८४ मतांनी पराभव केला. बाबासाहेब देशमुख यांनी पुन्हा एकदा सांगोला मतदारसंघ खेचून आणत मतदारसंघात शेकापचेच वर्चस्व असल्याचे सिद्ध केले आहे.

सांगोला विधानसभा मतदार संघांमध्ये पडलेली मते :

बाबासाहेब देशमुख - १ लाख १६ हजार २८०

शहाजीबापू पाटील - ९० हजार ८९६

दीपकआबा साळुंखे - ५१ हजार

शेकापचे डॉ.बाबासाहेब देशमुख २५ हजार ३८४ मतांनी विजयी.